शेतकरीप्रश्नी पंतप्रधानांना भेटणार : पवार

कळवण, सुरगाणा विकासासाठी ४०० कोटी

>> कळवण । दि. ७ प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन प्रश्न मांडणार आहे. तसेच नाशिक जिल्हा बँक प्रगतीपथावर आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

जनतेचे प्रश्न डोळ्यासमोर ठेवावे, विकासकामे मार्गी लावावी आणि सर्वांगीण विकास साधायचा हाच मुख्य ठेवून वाटचाल करतो. सप्तशृंगी गडाच्या विकास आराखड्यासाठी ८१ कोटी ८९ लाख तरतूद व येणाऱ्या वर्षभरात कळवण, सुरगाणा मतदारसंघासाठी चारशे कोटी रुपये निधी देण्याची ग्वाही देत ओझर धरणाचा प्रश्न मार्गी लावणार असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

स्व.सुनील महाजन यांच्या कांदा सेडमध्ये शेतकरी कृतज्ञता मेळावा, ४९४ कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण आणि आ. नितीन पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोहळ्याप्रसंगी अजित पवार बोलत होते. अध्यक्षस्थानी आ. व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ होते. व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आ. माणिकराव कोकाटे आ. दिलीप बनकर, आ. हिरामण खोसकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयश्री पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, बाजार समितीचे सभापती धनंजय पवार, योगेश महाजन, रवींद्र पगार, नारायण हिरे रावसाहेब हिरे, देवीदास पवार अशोक पवार, रंजन ठाकरे, शिवसेनेचे समितीचे अध्यक्ष भूषण पगार, राजेंद्र भामरे, चिंतामण गावित आदी उपस्थित होते. मेळाव्यात सत्कार करताना अजित पवार यांनी आ. नितीन पवार यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य करतांना सध्या ११०० कोटींची कामे ४ वर्षात केली आहे, परंतु निवडणुकीपर्यंत १५०० कोटींची कामे मतदारसंघात झालेली असतील. जिल्हा बँकेला अडचणीत असलेली बँक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी कडेचे निर्णय घ्यावे लागतात. ती बँक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी महाराष्ट्रातील सरकार कटिबद्ध आहे. कच्चा रस्ता आणि अंगणवाडीसेविका यांच्याबाबत सरकार मोठा निर्णय घेणार आहे. मागे काही कामांना स्थगिती होती. आता सगळ्या स्थगिती उठवल्या आहेत, असेही पवार म्हणाले.

ओतूर धरणासाठी बिल विधानमंडळात सुप्रमता मंजुरी देऊ. शासनाने दीड लाख कर्मचारी भरती आणि दीड हजार रोजंदारी कर्मचारी यांना कायम करण्याचा निर्णय घेतला आहे. विविध संस्थांचे कामे केलेल्या ठेकेदारांचे दहा हजार कोटी रुपये देण्याची वित्त विभाग कामाला लागलेला आहे. तसेच ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता इतरांना आरक्षण देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे अजित पवारांनी सांगितले. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ आणि छगन भुजबळ, खा. सुनील तटकरे, डॉ. रावसाहेब मिरे, देवीदास पवार, रघुनाथ महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी यशवंत गवळी, शरद गुंजाळ, बबू पाटील, सुमन देवरे, भास्कर जाधव, पांडुरंग वाघ, राजेंद्र पवार, रोहित पगार, राहुल पगार, राजू पवार, जयेश पगार, रोहीत पगार, चेतन पैठ, बाळासाहेब जाधव, राजू महाजन, पुरुषराज गांगुर्डे, अनिल पोहेकर, राजू पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन मनेश शिंदे यांनी केले.

आ. पवार भावुक

आ. नितीन पवार यांनी सांगितले की, मतदारसंघात हा आदिवासी बहुल भाग्यात येत असून जिल्हा परिषद शाळांची वाईट अवस्था झाली आहे. शासन किंवा सीएसआरच्या माध्यमातून शाळांची दुरुस्ती करावी. तसेच नाशिक- दिंडोरी- वणीकडून सप्तशृंगी गडाच, सुरगाणा तालुक्यातील उंबरठाणाला ग्रामीण रुग्णालय व्हावे, कसबा वासलाकडे सुरू करावा, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी क्रीडा प्रबोधिनी करावी, ओतूर धरणाचा प्रश्न, सुरगाणा तालुक्यात लिफ्ट प्रकल्पाला मंजुरी द्यावी, अर्बुदसागर परिसराला दिलेला पर्यटन दर्जा यांच्या स्थानिकांसह मंजुरी देऊन पर्यटन विकास करावा, धरण झालेल्या बसेस बदलून नवीन गाड्या द्याव्या, या मागण्या येत्या तर अगदी सुरुवातीलाच अजित दादांसोबत अगदी सोडतांनाच आहे. जनतेचे प्रश्न सोडवायचे ही जनता आणी आहे. मी काम करतो, निधी आणतो, बाकी चालते शिवायचे आहे असे आ. पवार भावुक झाले. अशि त्यांना गहिवरून आले.

अजित पवारांचे देवदर्शन

सप्तशृंगीगड । सप्तशृंगीगडावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज (दि.७) सकाळी ११ वाजता आदिशक्ती सप्तशृंगी देवीचे दर्शन घेतले. यावेळी गडावर राहुरी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी राहुरी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, पक्षाचे मुंबई अध्यक्ष समीर भुजबळ, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, देवीदास पिंगळे, दिलीप बनकर, प्रा. जिल्हा अध्यक्ष अजय दुधे, युवा उपाध्यक्ष दीपक जोशकर, युवक शहर अध्यक्ष शांताराम सतपुरे, विवेक वेलंजे, दिलीप बर्डे, विनोद गवळी, ललित निकम, सुदर्शन दहाडोळे, राजेश गवळी, संतोष वेलंजे, विजय वेलंजे, विष्णू सावंत, बाबुराव गवळी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

पाणी पळवा–पळवी थांबवण्याचे आश्वासन

>> दिंडोरी । दि. ७ प्रतिनिधी

दिंडोरी तालुक्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यांची दुरावस्था झाली असून कामे मंजूर आहे. मात्र ठेकेदारांच्या बिले मिळत नसल्याने रस्त्यांची कामे तुंबा आहे तरी सदर कामांचा त्वरित निधी देण्याची मागणी वारंवार लोपीकांनी केली.

पवार यांनी सदर निधी देत सर्व रस्त्यांची कामे सुरू होतील, असे आश्वासन दिले. ग्राम पाणीपुरवठा संघाचे माणिकराव पाटील, अशोक भालेराव, रामभाऊ ढगे, संतोष भालेराव, निलेश भालेराव, तुषार भालेराव, राहुल कावळे आदी तिसगाव धरण लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचे शिष्टमंडळाने अजित पवार यांची भेट घेत तिसगाव धरण भरलेले नसताना आलाय कालव्याद्वारे पाणी सोडले जात असल्याची तक्रार करत सदर पाणी बंद करण्याची मागणी केली. पवार यांनी माहिती घेत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे दिंडोरी दौऱ्यावर असताना त्यांचे दिंडोरी, लखमापूर फाटा, वणी येथे कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत करण्यात आले.

अजित पवार यांच्या समवेत राहुरीचे नेते सुनील तटकरे, आ व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आ. दिलीप बनकर आदी सहभागी होते. तत्पूर्वी दिंडोरी येथील मुख्य चौकात दिंडोरी बाजार समिती उपसभापती कैलास मवाळ, प्रकाश वडजे, उपजिल्हाध्यक्ष दीपक जाधव, योगेश बर्डे, भाजप शहराध्यक्ष नितीन गांगुर्डे, माजी उपजिल्हाध्यक्ष लता बोरसे, अविनाश बोरसे, ज्येष्ठ नेते विश्वासराव देशमुख आदी कार्यकर्त्यांनी पुलाचपुष्प देवून जोरदार स्वागत करत विविध मागण्यांचे निवेदन दिले. राहुरी पुरुक कॉलेजमधे लखमापूर फाटा येथे सहा जेसीबीच्या पुष्पवृष्टी तसेच ढोलाच्या मध्य पुष्पहार घालत भव्य स्वागत करण्यात आले. कादवाचे चेअरमन श्रीराम शेटे, जिल्हा बँक संचालक गणपतराव पाटील, युवक कॉंग्रेस जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र उफाडे, कृष्णा मातेरे, संपत वडे, राहुल कावळे, एलु गटकळ, नितीन भालेराव, परिक्षित देशमुख, वैभव गायकवाड, विकी पोरजे आदी कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले.

वणीत स्वागत

>> वणी । दि. ७ वार्ताहर

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे वणी येथील क्रांतीसूर्य बिरसामुंडा चौक येथे आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी करत ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले. राज्याचा उपमुख्यमंत्री पदाची धुरा पुन्हा एकदा हाती घेतल्यानंतर पक्ष वाढ घेत गेला ९ महिन्यातील हा तुमचा दौरा असल्याने त्यांच्या गटातील कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांचे येथील बिरसा मुंडा चौकातील आगमन होताच कार्यकर्त्यांनी 'अजित पवार आगे बढो, हम तुमारे साथ है' अशा घोषणा देत त्यांचे स्वागत केले. यावेळी सरपंच मधुकर भास्कर, उपसरपंच जितेश कड, व्यापारी बँकेचे अध्यक्ष महेंद्र बोरा, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत कड, माजी उपसरपंच मनोज सावे, भाजपचे महेंद्र पगार, किरण शिंदी, दर्शन दायमा, मधुर जैन, रविकुमार सोनवणे, राहुल गांगुर्डे, जगन जाधव, जयेश शेख, विजय बर्डे, किरण गांगुर्डे, एलाबेग खाडे, बाळासाहेब पाडवे, संजय वाघ, बेनु पाटील, मिना पठाण, शकुंतला कोकाटे आदी उपस्थित होते.

उद्या काँग्रेसची आढावा बैठक

शहराध्यक्ष अँड. छाजेड यांची माहिती

>> नाशिक । दि. ७ प्रतिनिधी

येत्या ९ ऑक्टोबर रोजी जय शंकर फेस्टिवल लॉन औरंगाबादरोड येथे काँग्रेस पक्षाची उत्तर महाराष्ट्र विभागीय आढावा बैठक होणार आहे. या बैठकीला प्रदेशाध्यक्ष आ. नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, आ. प्रणिती शिंदे तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष आ. कुणाल पाटील, जिल्हा प्रभारी डॉ. राजू वाघमारे, क्रिस किशोर दत्त उपस्थित राहणार आहे. अशी माहिती शहर काँग्रेसचे अध्यक्ष अँड. आकाश छाजेड यांनी दिली. पक्ष संघटना तसेच अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने दिलेल्या कार्यक्रमाच्या बाबत व पूर्व पक्षाच्या आणि लोकसभा, विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांबाबत मंथन या बैठकीत होणार आहे. या बैठकीला नाशिक शहर व जिल्हा तसेच अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार येथील पक्षाचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी दहा वाजता बैठकीला सुरुवात होऊन संध्याकाळी पाच वाजेपर्यंत आढावा बैठक होणार आहे.

आज प्रगतिशील साहित्य संमेलन

नाशिक । नाशिक जिल्हा प्रगतिशील साहित्य संमेलन तिसरे आज आठ ऑक्टोबरला नवी. एस. नाईक समाज सभेमध्ये होणमध्ये पार पडत आहे. कार्यक्रमाचे तुकाराम चौधरी नाशिक जिल्हा प्रगतिशील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असून स्वागताध्यक्ष कॉ. राजू देसले राहतील. राष्ट्रीय पुरस्कार विजेते तालुकाध्यक्ष विक्रम पिंडा यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी हिरामण झिरवाळ, डिल व लेखाचे साहसवादक माधव पैठ, साहित्यिक संजय दोबाडे, कचरू भालेराव, अड. तानाजी जायभावे उपस्थित राहणार आहेत. पहिले सत्र उद्घाटन सन्मान सोहळा ९.३० ते १२ या वेळेत होणार आहे. १२. ते १. पहिला परिसंवाद आणि २.ते ३. या वेळेत दुसरा परिसंवाद होणार आहे. प्रगतिशील साहित्य व साहित्यिकांची लढणे या परिसंवादाचे अध्यक्ष प्रा.डॉ. विवेक खरे असून प्रा.डॉ.चारुता शेख, अमोल वाघुल, लता कांबळे आदी वक्ते आपले विचार मांडतील. भारतीय संविधान व आजची परिस्थिती या परिसंवादाचे अध्यक्ष करणारतगर पगारे असून प्रा. डॉ. पी. डी. देवरे, किरण मोहिते, नाशिमुद्दीन काजी, हे वक्ते आपले विचार मांडतील. ३.०० ते ५.३० कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रावसाहब, बबन, टीडीएम असा विचपटांची गाणी लिहिणारे गीतकार आणि सुप्रसिद्ध कवी विनायक पवार यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. कवी संमेलनाचे सह समन्वयक कवी अरुण पोतदार राहतील. साहित्यिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रदेश जिल्हाध्यक्ष प्रमोद अहिरे, सचिव प्रल्हाद पवार यांनी केले आहे.

६७ दुर्लभ जडी-बुटींनी निर्मित 'सच्ची सहेली'
आयुर्वेदिक टॉनिक खालील समस्यांमध्ये विशेष साहाय्यक आहे.